तैसे भूतजात सर्व | हे माझेचि कीर अवयव | परी मायायोगे | जीव दशे आले ||
म्हणून माझेचि मी नव्हती | माझेचि मी नोळखती | अहंमता भ्रांति | विषयांध झाले ||६६|६७|७|ज्ञा.

ह्या दोन ओव्यांमध्ये मी आणि माझेची ह्या दोनच शब्दांनी धुमाकूळ घातला आहे, असेच म्हणायला हवे. इथे श्रीकृष्णाने मीपणा आणि माझेपण ह्या दोन गोष्टी अंगीकारल्या आहे. उपदेश करतांना तो श्रीकृष्ण आपल्या सगळयांनाच "मीपणा सोड" असे सतत बजावत असतो परंतु तो नियम स्वतःच्या बाबतीत त्याने बाद ठरवलेला दिसतो त्याचे कारण इथे त्याने ब्रह्म नावाच्या तत्वाचा "रोल" स्वीकारला आहे किंवा भूमिका स्वीकारली आहे. हे सगळे भूत जात (म्हणजे सजीव गोष्टी) माझे अवयव आहेत परंतु मायेमुळे ते या दशेला आले आहेत असे पहिले विधान आहे अवयव स्वतंत्रपणे जिवंत नसतात. त्यांना जिवंतपणा येणे म्हणूनच खरे नाही किंवा खोटे आहे असे विधान इथे केले जाते. ह्या खोटेपणाला आपल्यात माया हा शब्द आहे. पुढे श्रीकृष्ण म्हणतो हे जे जीव घडले ते माझेच परंतु मायेने घडलेले म्हणून मी जो सत्य आहे तो या असत्यात किंवा मायेत नाही आणि हे जीव माझे असले तरी मीपणामुळे अहंकारयुक्त झाले आहेत मायारूप जगातल्या मायारूप विषयांनी आंधळे झाले आहेत किंवा नेहमीच्या मराठीत शेफारले आहेत. ह्या शब्दच्छलाने खरेतर गोंधळल्यासारखे होते. थोडक्यात श्रीकृष्णाला बाजूला ठेवून असे म्हणता येईल की केवळ ब्रह्मच सत्य आहे. इतर सगळे म्हणजे हे विश्व त्यामानाने जरा खोटेच आहे. ज्या सातव्या गीतेच्या अध्यायात ह्या ओव्या येतात. त्या अध्यायाला विज्ञानयोग असे नाव आहे. विज्ञान म्हटले म्हणजे सगळे कसे स्पष्ट संयुक्तिक परखड हवे. पुराव्यासकट हवे असे जर आहे तर मग इथे ही भ्रमात्मक भाषा आणि गोलमाल कशासाठी असा नैसर्गिक प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर वकिली थाटात देता येते. ते असे. आधुनिक विज्ञान असे म्हणते की जर अणूंमधल्या हालचाली बघितल्या तर ह्या हालचालींना आवाक्यात घेता येत नाही कारण त्या अस्थिरतेने भरलेल्या असतात. अणूमधला कण कधी असतो त्याचा तरंग कधी होतो हा तरंग निर्माण झाल्यावर तो अणूमधला कण कसा हलतो ह्याचे निरीक्षण करायला गेल्यास ज्या प्रकाशाच्या सहाय्याने आपण त्या हालचालीवर दृष्टीक्षेप टाकतो तो प्रकाशाचा किरणच मुळी अणूच्या अस्थिरतेला कारणीभूत ठरतो. डोळा ठरेपर्यंत सगळी परिस्थितीत बदलते आणि डोळा ठरल्यावर प्रकाशामुळे आणखीनच गोंधळ होतो. थोडक्यात ह्या विश्वात जशा सतत हालचाली चालू असतात तशाच त्या अणूमध्ये अव्याहत चालतात. अर्थात निसर्गात जसे सरासरी धरून नियम केले जातात तसेच अणूंमधेही सरासरीप्रमाणे नियम असतात. परंतु विश्वात सगळीडेच अस्थिरता हाच स्थायीभाव असतो असे चक्रात्मक विधान करावे लागते. ही चक्रावणारी अस्थिरता म्हणजे माया त्यात आपण जन्मतो जगतो वाढतो आणि मरतो पण त्या काळात बुडत्याला काडीचा आधार ह्या न्यायाने ह्या मायेला आपण कवटाळतो त्यातल्या मोहमय अनुभवातून बुडताना मूळ ब्रह्माला विसरतो असा निष्कर्ष ह्या ओव्यांमधून काढता येतो. आपल्या नेहमीच्या जगण्यातला एक अस्थिर पदार्थ म्हणजे पाणी ते नदीच्या स्वरूपात वाहू लागले म्हणजे मग विचारायलाच नको. एक मोठे वेधक विधान म्हणते तुम्ही तुमचा पाय त्याच नदीत दोनदा बुडवू शकत नाही कारण दुसऱ्या वेळी ती नदी आणि तुमचा पाय दोन्ही बदलले असतात.

४४९ शब्द

रविन थत्ते
rlthatte@gmail.com

जिये ब्रह्माचळाचा आघाडा | पहिलिया संकल्पजळाचा उभडा | सेवेंचि महाभूतांचा बुडबुडा | साना आला ||

माया कितीही खोटी असेना का ज्ञानेश्वर तिच्या उपपत्तीबद्दल सांगताना भारतीय तत्वज्ञानातील मूळ बैठक सोडत नाहीत. ब्रह्म नावाच्या पर्वताच्या (चळाच्या) तुटलेल्या कड्यातून (आघाडा) पहिल्या संकल्पामुळे उसळी मारून निघाल्यावर तिच्यात पंचमाहाभूतांचा लहानसा बुडबुडा तयार होतो असे ओवी म्हणते. ब्रह्मामध्ये हा संकल्प का निर्माण होतो ह्याचे स्पष्टीकरण जसे पदार्थविज्ञानातही देणे शक्य झालेले नाही तसेच भारतीय तत्वज्ञानातही नाही. ही नदी पंचमाहाभूतांच्या बुडबुड्याने सुरु होते हे वर्णन मोठे वेधक आहे. आपले आयुष्य एक बुडबुडाचा असतो. ह्या बुडबुड्यातून निघालेल्या नदीत काय काय होते तर त्यात द्वेषरूप भोवरे आणि मत्सराची वळणे असतात. त्या नदीवर सुखदुःख रुपी पुराड तरंगते. ह्या नदीत गर्वाच्या मोठ्या धारा आहेत. अविवेक आणि गोंधळ नावाचे मासे ह्या नदीत पोसले जातात. आज्ञानाचे भोवरे वक्रगतीने फिरतात ही नदी पार करून जाण्यासाठी उपाय तरी काय? इथे बुद्धी चालत नाही, वेद नावाच्या साहित्याला इथे माघार घ्यावी लागते. यज्ञकर्म निष्फळ ठरते आणि अष्टांग योगांनाही ही नदी दाद देत नाही. ही नदी पार करण्यासाठी कर्माचा उपायही चालत नाही. हे सगळे उपाय कसे आहेत हे सांगतांना ज्ञानेश्वर म्हणतात विषयासक्त माणसाला (पुरुषाला) ज्याप्रमाणे स्त्री जिंकता येत नाही (हा दृष्टांत स्त्रियांनाही लागू पडतो का?) कुपथ्य करणाऱ्याचा रोग ज्याप्रमाणे बळावतो किंवा माशाला ज्याप्रमाणे गळ गिळता येत नाही त्याप्रमाणेच हे उपाय निरुपयोगी ठरतात. मग करायचे तरी काय? तर त्यातले पहिले उत्तर " तू मला शरण ये " असे आहे. थोडक्यात ही मायानदी दुय्यम आहे हे ओळख. ब्रह्मच केवळ खरे आहे हा विचार मनात सतत बाळग (इथे श्रीकृष्ण हा ब्रह्माचा प्रतिनिधी आहे.)हे ब्रह्मतत्व सदोदित मनात बाळगणे ह्याला ज्ञान म्हणतात. हे एकदा झाले की मग आपोआपच वैराग्य निर्माण होते आणि हे वैराग्य मायानदी चहुबाजूने उसळत आणि उधळत असली तरी तुम्हाला तारते. ह्या वैराग्यावस्थेत गुरु नावाचा नावाडी भेटू शकतो तो तुम्हाला अहंकारापासून वाचवतो, संसाराचे माप घेण्यास मदत करतो आणि मग त्याच नदीत पाय टेकता येतील अशी सोपी पायवाट सापडते. संसारातली वाट प्रवृत्तिरूप असते तो या नदीचा अलीकडचा तीर असतो वरील प्रयोग जमला तर मग निवृतिच्या(पलीकडल्या) तीराला माणूस लागतो. मायानदी ह्या विषयावरच्या ज्ञानेश्वरांच्या ओव्यांमधले (६८-१०२/७/ज्ञा.) शब्द वैभव अनुभवण्यासाठी आधी भाषांतर वाचावे आणि मग मूळ ओव्यांकडे वळावे असा माझा अनुभव आहे. एकंदरच संसाराकडे तिऱ्हाइतासारखे बघण्यासाठी ह्या ओव्या एक उत्तम उपाययोजना आहे. माझ्या अल्पमती आयुष्यात हे तिऱ्हाइतपणच माझ्या मदतीस आले आहे. गुरुभेट झालेली नाही झाली असली तरी आकलनात आलेली नाही ज्ञान दूरच राहिले आहे पंरतु व्यवहार करतांना ज्ञानेश्वरांच्या ओव्या मात्र सोबती राहिल्यामुळे माझ्यामुळे इतरांना काय त्रास झाला असेल तो असेल पण मला मात्र संथ आणि समाधानी वाटले आहे हे नक्की.

३९९ शब्द

**रविन थत्ते**
**rlthatte@gmail.com**